International Journal of Multidisciplinary Research and Development
Online ISSN: 2349-4182, Print ISSN: 2349-5979, Impact Factor: RJIF 5.72
www.allsubjectjournal.com
Volume 3; Issue 11; November 2016; Page No. 211-212

# हरित राजकीय सिध्दांताचा विश्लेषणात्मक अभ्यास

**डॉ. लक्षटे रत्नाकर बाबुराव**

पदवी व पदव्युत्तर राज्यशास्त्र विभाग प्रमुख देगलूर महाविद्यालय, देगलूर.

**प्रस्तावना**

राज्यशास्त्रात अनेक राजकीय विचारप्रणालींचा अभ्यास केला जातो. या सर्वांमध्ये वर्तमानात पर्यावरणीय घडामोडींचा मानवी जीवनावर होणारा परिणाम व या परिणामास कारणीभुत असणारे मानवाचे राजकीय वर्तन या सर्वांशी संबंधित हरित राजकीय सिध्दांत हा अधिक महत्वाचा आहे. हरित राजकीय सिध्दांतास Green Political Theory या नावाने इंग्रजी भाषेत संबोधले जाते. मानवाचे जीवन पर्यावरणाप्रमाणेच कसे हरीत व्हावे यावर या सिध्दांतात भर दिला जातो. आधुनिक राजकीय सिध्दांत म्हणून या सिध्दांताची सर्वत्र ओळख आहे. भारतापेक्षा युरोपमध्ये अनेक सामाजिक चळवळी व लोकांनी पर्यावरणीय विषयाना शासन दरबारात व लोकांत प्रखरपणे मांडुन त्यास जनाधार मिळवून दिला. परिणामतः त्याचे रुपांतरण लोकचळवळी व राजकीय पक्षात झाले. हरित राजकीय सिध्दांताने आधुनिक काळात सुत्रबध्द पध्दतीने पर्यावरण, मनुष्य आणि शासन यांच्यातील आंतरसंबंध व परस्परविरोध मांडण्याचे कार्य केले असले तरी पर्यावरणाचा आणि मनुष्याचा प्रारंभापासूनचा संबंध आहे. भारत चीन या देशात निसर्गाशी एकरुप होवून जीवन जगण्याचा विचार मांडला. पर्यावरण मानवी जीवनाचा अविभाज्य घटक आहे. पर्यावरणाशी संबंधीत सर्व घटकांवर शासकीय धोरणांचा प्रभाव पडतो. या धोरणाुसार घेण्यात येणारे निर्णय व अंमलबजावणीचा पर्यावरणाची दशा व स्थितीवरही प्रभाव पडतो. पर्यावरण हा जरी अलिकडील काळातील चर्चिला जाणारा विषय असला तरी त्याशी संबंधित प्रदूषण, भुकंप, जंगलाचा विनाश, भू-स्खलन हे पर्यावरणीय विषय व समस्या नवीन नाहीत.

प्रस्तुत लेखात हरित राजकीय सिध्दांताचा सैध्दांतिक आशय समजून घेवून राज्य, शासन व प्रशासनाशी पर्यावरणाचा सहसंबंध व त्यांच्यातील विरोधाभासामुळे या विषयाला लोकचळवळीचे स्वरुप कसे प्राप्त झाले याचे विश्लेषण करण्याचा प्रयत्न करण्यात आला.

राज्यशास्त्राच्या प्राचीन काळातील विचारवंतांनी पर्यावरणाशी संबंधित विषयाला आधार मानून मानवाच्या राजकीय वर्तनाचा अभ्यास केला. न्युजीलंड, पश्चिम जर्मनाी व इंग्लंड मध्ये अनेक राजकीय पक्ष व दबावगट या विचारसरणीला आधार मानून सक्रिय झाले. त्यानी या प्रश्नावर अनेक निवडणुका लढवल्या. १९७२ ला न्युजीलंड मध्ये पहिला हरित पक्ष स्थापन झाला. ज्याचे नाव Values Party असे होते. इंग्लंडमध्ये या पक्षाचे नाव People नंतर Echology Party व १९८५ मध्ये Green Party असे ठेवण्यात आले. जर्मन पर्यावरणवादी स्वतःला Greens म्हणवून घेतात.

विशेषतः इंग्लंडमधील औद्योगिक क्रांती व युरोपमधील शास्त्रीय जाणीवांनी पर्यावरणीय विषयाप्रतीच्या चिंता अधिक वृध्दिंगत केल्या. परिणामतः १९ व २० व्या शतकात पर्यावरणीय मुद्यांशी संबंधित विविध कायदे बनवण्यात आले. लोक समुहाचे संघटन व जागरण वाढले, विविध चळवळी तिचे कार्यकर्ते या दिशेने कार्य करु लागले. भौतिक साधनांच्या विकासामुळे पर्यावरणावर घातक परिणाम होतात. या भौतिक साधनांच्या प्रगतीचा पर्यावरणावर घातक परिणाम होवू नये म्हणून प्रथमतः जंगली जीव व जीवन आणि प्रदूषण रोखण्यावर भर देण्यात आला. तदनंतर आधुनिक युगात वाढती लोकसंखया, जंगलांचा नाश, कीटकनाशक, औषधी वनस्पती, प्रदुषणास रोखणे या विषयाचे महत्व वाढले. आज जलवायू परिवर्तन, जैव विविधतांचे होणारे नुकसान, जैविक अंगांचा विकास, ओझोन थर इत्यादी विषय जागतिक बनले आहेत. परिणामतः २० व २१ व्या शतकात अधिक देशांनी पर्यावरणीय विषयाला प्रभावित करणारे धोरण आखले. तरीही पर्यावरणीय संरक्षण हा विषय चिंतेचा आहे. आधुनिक काळातील पर्यावरणीय संरक्षणाच्या विषयाने हरित राजकीय सिध्दांताला जन्म दिला. कारण पर्यावरण संरक्षण, काळजी, प्रदूषण रोखणे या विषयाने पर्यावरणवाद या राजकीय व सामाजिक विचारसरणीचे स्वरुप धारण केले. ज्यामुळे हा विषय राजकीय विषय बनला. पर्यावरण या विषयास एक नवा राजकीय विचार म्हणून स्वीकारण्यात आले. २२ एप्रिल १९७० ला अमेरिकेत पृथ्वी दिवस साजरा करण्यात आला. जो सर्वांत मोठा पर्यावरणीय चळवळीचा भाग होता. तेथुन या विषयाला लोकप्रियता मिळाली. परिणामतः हा विषय राजकीय चिंतनाचा विषय बनला. यामुळे राज्यशास्त्रात १९६० नंतर ग्रीन राजकीय सिध्दांत उदयास आला. या सिध्दांताने पर्यावरणविषयी नव्याने विचार करणारा राजकीय मार्ग सर्वांसमोर मांडला. या सिध्दांताने दोन पातळीवर काम केले. एक या विचारास लोक चळवळीत रुपांतरीत केले. दुसरे या विषयाच्या अनुषंगाने आवश्यक धोरण बनवण्याची प्रक्रिया शासकीय स्तरावर लागु झाली. या नव्या विचार व चळवळीने हरित राजकीय सिध्दांतास लोकप्रिय बनवले.

**हरित राजकीय सिध्दांत**

निसर्ग हा माणसाचे Inorganic शरीर आहे. निसर्ग हा माणसाच्या शरीराचाच एक भाग समजला पाहिजे. या सिध्दांताने औद्योगिकरणाला विरोध, पृथ्वीवरील नैसर्गिक संसाधाचे संरक्षण, भांडवलशाहीला विरोध, मानवी संस्कृतीची चिंता, निसर्ग केंद्रीत विचारसरणी, पर्यावरणवादातील स्त्रीवादी दृष्टीकोन, सुधारणावादी दृष्टीकोन, निःशस्त्रीकरणाचे समर्थन, नैतीकतेवर आधारीत चळवळ, भावी पिढीसाठी चांगल्या पर्यावरणाचा पुरस्कार, संतुलित पर्यावरणासाठी विज्ञान तंत्रज्ञानाच्या वापरावर मर्यादा, लोकशाही मार्गानेच पुर्ततेवर भर, पर्यावरणाप्रती जागरुक नागरिक निर्माण करण्यावर भर दिला. आधुनिक राजकीय विचारसरणी उदा उदारमतवाद, समाजवाद, स्त्रीवाद, मार्क्सवाद या सर्वांनी पर्यावरणाच्या अनुषंगाने विचार करण्यास भाग पाडले. जैवविविधतता आणि भौगोलिक पर्यावरण ही एक स्वतंत्र विचारसरणी आहे. लोकशाही, स्वातंत्र्य, अधिकार, न्याय, मानवी हक्क, समता, स्त्रीवाद इत्यादी संकल्पनाना पर्यावरणीय संदर्भाने अभ्यासले जावू लागले.

हरित राजकीय सिध्दांत हा मानवी मूल्यांचा सिध्दांत आहे. या सिध्दांताने सर्वसमावेशक आणि नैतिकतेला अधिक महत्व दिले. पर्यावरणीय सर्वसमावेशकता म्हणजे संपूर्ण पर्यावरणाबाबत विचार करावा ा की त्याच्या एका भागाबाबत. मानवीय व अमानवीय निसर्ग आणि निसर्गातील विभिन्न घटक एकमेकांशी संबंधित असतात. त्यामुळे कोणत्याही एका विषयाला प्राथमिकता व प्राधान्य देण्याऐवजी संपुर्ण पर्यावरणाचा विचार करावा लागेल. तसेच निसर्गाप्रती आम्हास एक उदार भावना बाळगावी लागेल. निसर्गाप्रती आमचा दृष्टीकोनात बदल व्हावा. निसर्ग आणि निसर्गातील इतर घटक मग ते सजीव असोत की, निर्जीव त्यांचे अधिकार सुरक्षित ठेवावेत व त्यांचे अस्तित्व टिकवून ठेवावे.

अनेक हरित राजकीय सिध्दांताच्या विचारवंतांनी या सिध्दांतास प्राधान्याने मांडले. निसर्गाला मानवी हस्तक्षेपापासून वाचवण्यासाठी हा सिध्दांत मांडला. निसर्गात कांही मूल्य असतात. यास प्रमाण मानुन आपली मांडणी केली. जीवााची वाढ हे एक उदात्त मूल्य आहे. त्यांच्या मते मानवीय व अमानवीय घटकात समता आहे. सर्व घटक परस्परावलंबी व परस्परनिर्भर आहेत. कोणीच परिपूर्ण नाही. सर्व घटकांचे समान महत्व आहे. जीवनातील सर्व रुपांना जीवंत राहण्याचा अधिकार आहे. जीवााच्या या रुपात नदी, जमीन, संस्कृती, जैवविविधता या सर्वांचा समावेश होतो. आमचे कर्तव्य आहे की, अमानवीय घटकांचे नुकसान करु नये. तसेच निसर्ग आणि मनुष्य वेगवेगळे आहेत असे म्हणणे चुकीचे आहे. मनुष्य निसर्गाचा नियंत्रणकारी घटक आहे. व्यक्ति निसर्गाचा एक भाग आहे. १९७२ साली रोम क्लबच्याद्वारे प्रायोजित अहवालाने हे स्पष्ट केले की, हरित राजकीय सिध्दांतकार विकासाच्या मर्यादेला मान्य करतात. या अहवालासोबत जैवविविधतेच्या मर्यादा आणि लोकसंख्येचा विकास याबाबतही चर्चा प्रारंभ झाली. या अहवालात औद्योगिक उत्पादन, प्रदूषण, खाद्य उत्पादन आणि लोकसंख्या विकास यांच्या विश्लेषणाच्या साह्याने भविष्यवाणी करण्यात आली. की जर वरील सर्व घटक आपल्या विकासाच्या गतीला पुढे नेतील तर येणाऱ्या १०० वर्षांत

विकासाची मर्यादा सर्वांसमोर येईल. वरील सर्व घटक परस्पर संबंधीत आहेत. या अहवालातून मांडण्यात आलेले मुद्यांमुळे पर्यावरणाच्या विनाशास टाळता येते. परंतु थांबवता येत नाही. पर्यावरणीय विषयाच्या चिंतनात या अहवालाचे अधिक महत्व आहे. त्यामुळे पर्यावरणीय विषय राजकीय क्षेत्रात महत्वाचे बाले. ज्यांचे सैध्दांतीकरण करण्यात आले. विकास आणि जीवंत राहण्याविषयी चिंता याबाबतचे चिंता समोर आले. या बाबत गार्रेट हार्डिन या लेखकाने नैसर्गिक साधने मर्यादीत आहेत आणि मानवी जमात त्यास नष्ट करण्याच्या प्रयत्नात आहे. यामुळे अंत नक्कीच आहे. या समस्येवर उत्तर शोधण्यासाठी सामुहिक सहकार्य करावे लागेल. विकसनशील देशांच्या शासानांनी आपली लोकसंख्या वाढ कमी नाही केली किंवा निसर्गातील घटकांच्या विनाशास रोखलो नाही. तर त्याना मदत करु नये त्यांच्यावर बहिष्कार टाकावा. याशिवाय अनेक राजकीय सिध्दांतकारांनी पर्यावरणीय राजकारणाबाबत आपले चिंतन मांडले. त्यांच्या मते नैसर्गिक संसाधनांचे नवनवीन स्त्रोत पुढे येत आहेत. परंतू आर्थिक विकासाचे नवे धोरण या संसाधनासह पर्यावरणास नुकसान पोहचवत आहेत. एकंदरीत सर्वच क्षेत्रातील अभ्यासकांनी पर्यावरणीय विषयास प्राधान्य दिले.

या राजकीय सिध्दांतात स्थिर समाजास मान्यता देणारा एक विचार पुढे आला. ज्यास चांगला समाज, शाश्वत समाज या अर्थाने संबोधतात. जर्मन हरित राजकारणाच्या मूळाशी ही स्थिर समाजाची संकल्पना आहे. जैवविविधतांचे उत्तरदायित्व, सामाजिक ञ न्याय व अहिंसा तत्वांच्या साह्याने पर्यावरणीय राजकारण व त्यांचा मानवी जीवन आणि शासन व प्रशासनाशी असलेला संबंध मांडण्यात आला. पर्यावरणीय समस्या राष्ट्रीय ञ नसुन आंतरराष्ट्रीय आहेत. यामुळे नागरिकांना राज्यांच्या सीमांतर्गत व बाहेर जावून विचार करावा लागेल. नागरिकत्व खाजगी व लोक समुह या दोघांशी संबंधित आहे. पारंपारिक नागरिकत्वाची संकल्पना व्यक्तिच्या लोक वर्तनाशी संबंधित आहे. व्यक्तिचे खाजगी व्यवहार, कर्ज, जीवन पध्दती इत्यादींचा लोकजीवनावर प्रभाव पडतो. व्यक्तिच्या खाजगी जीवन पध्दतीचा पर्यावरणाशी संबंध असतो. हरित राजकीय सिध्दांतास पोषक ठरावे असे प्रयत्न आंतरराष्ट्रीय स्तरावर झाले. उदा : १९४८ ला International Union for the conservation of nature and national resources या संस्थेची स्थापना झाली. १९५९ ला अंटार्क्टिका या खंडाचा शास्त्रीय संशोधनासाठी वापर करण्याचा करार झाला. १९६१ ला स्वित्झर्लंड मध्ये जागतिक प्राणी जीवा कोषाची स्थापना झाली. १९७२ ला सार्वभौम पर्यावरण परिषद झाली. १९८२ ला नैरोबी पर्यावरण परिषद झाली. १९९७ ला क्योटो करार झाला.

पर्यावरणीय क्षेत्राची काळजी करताना हा प्रश्न ािर्माण होतो की, पर्यावरणाच्या संरक्षणासाठी सामुहिक प्रयत्न केले जावे. या सामुहिक प्रयत्नांचा एक भाग म्हणुन पर्यावरणीय मुल्यांची जाण असणाऱ्या राजकीय पक्ष व समुहांची स्थापना करणे महत्वपूर्ण आहे. तसेच उपलब्ध राजकीय पक्षांना पर्यावरणाच्या संरक्षणाच्या दिशेने प्रयत्न करण्याचे धोरण लवकरच आखावे लागेल. अन्यथा पर्यावरणाचा ऱ्हास ञ ााल्याशिवाय राहणार नाही. असे जर झाले तर यामुळे नव्या राजकारणाची स्थिति निर्माण होईल. दूसऱ्या महायुध्दानंतरच्या औद्योगिक राष्ट्रांतील राजकीय हालचालींचा स्वरुप व प्रकृतीत अंतर दिसून येतो. यापूर्वी राजकीय विश्लेषण व चर्चेत आर्थिक विकास, स्थिर मूल्य, लोक व्यवस्था, राष्ट्रीय सुरक्षा, उपभोगवाद इत्यादी मुद्दे होते. राजकीय सहभागित्वाचे प्रमाण कमी होते. जी सहभागाची सक्रियता होती. ती राजकीय व आर्थिक अधिकारांच्या प्राप्तीसाठी असन राजकीय पक्ष व कामगार समूहांच्या सदस्यत्वापर्यंतच मर्यादीत होती. परंतू या स्वरुपाच्या राजकारणात शितुध्दोत्तर काळात बदल होवून नव्या गतीशील व सक्रिय राजकारणाचा उदय झाला. शितयुध्द काळातील पश्चिमी युरोपात विद्यार्थी चळवळ, शांतता चळवळ, महिला चळवळ, अण्वस्त्र विरोधी निःशस्त्रीकरणाची चळवळ, पर्यावरण चळवळ इत्यादी नव्या सामाजिक चळवळींचा जन्म झाला. या सर्व चळवळींचा उदय सामूहिक सामाजिक विरोधातून झाला. या सर्व चळवळींनी आपल्या ध्येयप्राप्तीसाठी राजकीय सहभागीत्व वाढावे म्हणून अनेक पारंपारिक व लोकशाही मार्गाचा अवलंब केला. या नव सामाजिक चळवळीचे समर्थक नव मध्यम वर्गातील शिक्षित व औद्योगिक समाजाचे व्यावसायिक, कर्मचारी होते. सेवा क्षेत्राचा विस्तार, उच्च शिक्षणाचा प्रसार, जीवनात सुधारणा, दळण वळणात क्रांती इत्यादीा उत्तर औद्योगिक समाजात पारंपारिक वर्ग विभाजन व श्रध्दात बदल केला. या सर्वांमुळे पारंपारिक औद्योगिक श्रमिक वर्गांना अपेक्षित एक नवा वर्ग निर्माण झाला. जो राजकीय पक्ष, नौकरशाह व प्रभावी मूल्याप्रति अधिक टिका न करणारा होता. या नव्या मध्यमवगाने पर्यावरणाशी संबंधित विषयात आवड दाखवली. त्यांची ही आवड वर्ग हितामुळे आहे का इतर कोणत्या कारणामुळे या बाबत कांही विचारवंतांनी सकारात्मक व नकारात्मक विवेचन दिले. त्या सर्वांच्या मते पर्यावरण हा विषय सर्वांशी संबंधित आहे. समकालीन पर्यावरणीय राजकारण एक नव्या मध्यम वर्गामार्फत होत आहे. ज्याचे मूल्य भौतिक सुरक्षेपेक्षा जीवनाची गुणवत्ता वाढवण्यावर आहे.

यावरुन आपणास सांगता येते की, पर्यावरणाचा विषय १९६० नंतरच्या राजकारणात पुढे आला. जो एक विचार व चळवळ म्हणून अभिव्यक्त झाला. वैचारीक दृष्टया त्याचे स्पष्टीकरण हरित राजकीय सिध्दांतात केले जाते. तर याबाबतची चळवळ एक राजकारण, धोरण आणि लोकनिर्णयाच्या स्वरुपात पुढे आले. सामाजिक न्याय, अहिंसा, मानवी हक्क, स्त्रीवादी दृष्टीकोन, विकेंद्रीकरण इत्यादी या विचारसरणीचे आधार आहेत. पर्यावरणीय काळजीमुळेच शाश्वत विकास आणि जैवविविधतेच्या आधुनिकीकरणाचे मुद्दे पुढे येत आहेत. हरित राजकीय सिध्दांच्या यशस्वीतेसाठी मानवी समाजात परिवर्तन करून उपभोगवादी वस्तूंचा हव्यास टाळावा लागेल. जीवन जगण्याची पध्दती बदलुन ती आनंददायी बनवावी लागेल. की ज्यामुळे बेकारी, बकालपण व गुन्हेगारी कमी होईल व मानवी जीवनास जगण्यास आल्हाददायी व चैतन्यमय वातावरण निर्माण होईल.

## संदर्भ ग्रंथ


1. विकास प्रशासना प्रिती जोशी-आर.बी.एस.ए.पब्लिशर्स, जयपूर-२००७.
2. राजनीति सिध्दात की रुपरेखा - ओ.पी.गाबा. आगरा.
3. राजकीय सिध्दांतातील मुलभूत संकल्पना - प्रा.दिगंबर आ.खेडेकर.
4. विचारशलाका-संपादक प्रा.नागोराव कुंभार-एप्रिल ते डिसेंबर २०१६.
5. जागतिकीकरण परिणाम आणि पर्याय-गजानना खातू,अक्षर प्रकाशन, मुंबई२००४.
6. २१st century world : Pesent scenario and challengs, Feb-२०१६ Editor Dr.Pandit Nalwade.
7. आंतरराष्ट्रीय संबंध - डॉ.शैलेंद्र देवळाणकर विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद.
8. शोध संपदा, संपादक डॉ.राजशेखर सोपूरे, फेब्रु. ते एप्रिल २०१३.